CMYK




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
।बीड ।परभणी ।छत्रपती संभाजीनगर ।जालना ।लातूर ।धाराशिव ।हिंगोली ।नांदेड ।नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे





●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक १५० ● रविवार, दि. ०८ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये

बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# कोपरांचे गुळ आणि बंडाचे मूळ

## युतीच्या उमेदवाराचे हातात हात , का पायात पाय ?



**बीड । प्रतिनिधी**

विधान सभेच्या मैदानात विरोधी गटाचा उमेदवाराशी दोन हात नंतर पण त्या पूर्वी स्वतच्या पक्षातील लोकांना गारद करून उमेदवारी मिळवण्याची किमया करावी लागणार आहे, यातून सहकारी पक्ष बंधूच्या साठी असूया निर्माण झाली आहे, विशेष हे की युतीचे धोरण नक्की नसल्याने अनेकांच्या कोपराचे गूळ एकमेकांत पायात पाय घालायला मजबूर करत आहेत . बीड आणि आष्टी याचे स्पष्ट उदाहरणे आहेत.

बीड मतदार संघात सर्वाधिक तयार असलेले उमेदवार दिसतात . अजित पवार गटाचे संपादक शेख तय्यब, फारूक पटेल, डॉ योगेश क्षीरसागर आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे अनिल जगताप, बाजीराव चव्हाण, भाजपचे राजेंद्र म्हस्के यांचे संपर्क चालू आहेत. तर आष्टीत भाजपचे सुरेश धस भीमराव धोंडे आणि अजित पवार गटाचे बाळासाहेब आजबे असे चेहरे असतील. यावरून युतीच्या धोरणात पक्ष बांधून ठेवताना उमेदवार मात्र भलते सक्रिय केले आहेत. बीड मध्ये डॉ. योगेश यांच्याकडे कुमक आहे, आर्थिक बळ आहे वडिलांचा राजकीय वसा आहे. अजित पवार हे वेगळे झाल्यापासून तन मन व धनाने देखील

(उर्वरित पान २ वर)

### ● योगेशचा खिसा खाली तय्यबभाईची टोपी वरी

अजित पवारांचा गुलाबी इव्हेंट यशस्वी करण्यासाठी डॉ योगेश डॉ सारीका हे नवरा बायको दिवसरात्र झटले , गर्दी शामियाना पाहुण्यांची बडदास्त , व्यवस्था चोख करताना डॉ योगेश यांनी तन मन आणि धन यात ओतले , आणि कार्यक्रमाला फारूक पटेल आणि संपादक शेख तय्यब यांनी दांडी मारली , गोपीनाथ मुंडे यांच्या काळात गट असायची मात्र नेता आला की सगळे एका जागेवर , मात्र इथे तसे नाही . फारूक पटेल व तय्यब भाई हेलीपैड वरुन गायब झाले . तय्यब भाई कडून अजित पवार यांना एक टोपी घालण्यात अली त्या टोपीची चर्चा योगेश यांच्या खर्चीक मेहनतीपेक्षा महागात गेली . यावरून उमेदवारीत सर्वाधिक चर्चा शेख तय्यब यांची होत आहे ज्यातून डॉ योगेश यांची सोय पक्ष कशी लावणार आहे .

### ● माजलगावात युतीची गोधडी

माजलगाव मतदार संघात युतीचे दादा लढणार नाहीत म्हणे पुतण्या पुढे करणार , आज युतीत असलेले आडसकर , मोहन जगताप , बाबरी मुंडे आणि वेशीवर असलेले निर्मळ यांच्यात उमेदवारी कुणाला यावर खल आहे त्यामुळे माजलगावात देखील युतीच्या तळ्यात अनेक मासे दिसू लागले आहेत.

## खूप दिवसांपासून रखडेल्या ठिबक अनुदानासाठी राज्याकडून 123 कोटींना मंजुरी

**मुंबई । प्रतिनिधी**

खूप दिवसांपासून रखडलेले ठिबक सिंचनाचे अनुदान शेतकऱ्यांना मिळणार आहे. कृषी विभागाने वारंवार केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य सरकारने या अनुदानासाठी १२३ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

यामुळे प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर डीबीटीद्वारे अनुदानाचे पैसे जमा होण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची बचत व्हावी, शेतकऱ्यांनी सिंचनाचा जास्तीत जास्त वापर करावा यासाठी ठिबक सिंचन अनुदान योजना राबवण्याचे ठरवले होते. ही योजना राबवली गेल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी या योजनेच्या लाभातून ठिबक सिंचन शेतात बसवले. पण या अनुदानाचे पैसे वेळेत न मिळाल्याने विक्रेते आणि डीलर यांना मोठा त्रास सहन करावा लागला होता. निवडणुकांच्या तोंडावर राज्य सरकारने आता या अनुदानासाठी निधी उपलब्ध करून दिला असून २०२१-२२ मध्ये ठिबक

(उर्वरित पान २ वर)

## परळीत सरस्वती नदीच्या पुराने बाधित झालेल्या ५५0 हुन अधिक कुटुंबांना धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठान कडून प्रत्येकी 10 हजारांची मदत

**तातडीच्या आपत्ती निधीतूनही प्रशासनाकडून प्रत्येक कुटुंबाला ५ हजारांची मदत; रविवारी धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत एकत्रित होणार वितरण; प्रत्येक बाधित कुटुंबाला मोफत धान्याच्या किटही देणार**

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरात मागच्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सरस्वती नदीला आलेल्या पुरात ५५० पेक्षा अधिक कुटुंब बाधित होऊन त्यांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी साहित्य धान्य आदींचे नुकसान झाले होते. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय



मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना प्रतिक कुटुंब दहा हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत रविवारी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे.

आपत्ती व्यवस्थापनाच्या तातडीच्या आपत्ती निवारण निधीतून देखील प्रशासनाच्या वतीने या प्रत्येक बाधित कुटुंबाला नियमाप्रमाणे प्रत्येकी ५००० रुपये याप्रमाणे तातडीची मदत देखील धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे अशी माहिती तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी दिली आहे. सरस्वती नदीला आलेल्या पुरानंतर धनंजय मुंडे यांनी या भागात प्रत्यक्ष जाऊन नागरिकांच्या भेटी घेत त्यांना धीर

(उर्वरित पान २ वर)

## छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल स्वामी गोविंददेव गिरी यांचे वादग्रस्त वक्तव्य

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. यावर वाद-प्रतिवाद सुरू असतानाच आता श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी म हाराज यांनी छत्रपती शिवरायांच्या सूरत लुटीबाबत वेगळेच विधान केले आहे. गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक मंडळाला भेट दिली असता एका वृत्तवाहिनीशी बोलताना स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी हे विधान केले आहे.



ते म्हणाले, संपूर्ण राज्य हिंदूंचे आहे, असे मानून छत्रपती शिवाजी महाराज कार्य करत होते. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेदरम्यान जेव्हा महाराजांना आर्थिक चणचण भासत असे आणि अशावेळी

(उर्वरित पान २ वर)

## "फितूरीचे संस्कार दाखवले"; बार्शीहून 300 गाड्या आल्या, जरांगेंचा आमदार राऊतांवर हल्लाबोल

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले असताना, मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे



पाटील यांच्यावर सडकून टिका करून त्यांना चॅलेंज दिल आहे. जरांगे यांनी देखील आव्हान स्वीकारल्याचे जाहीर केलं. या पार्श्वभूमीवर बार्शी येथिल मराठा बांधवांनी तब्बल ३०० गाड्याचा ताफा घेऊन शनिवारी अंतरवाली सराटी येऊन आमदार राजेंद्र राऊत यांच्या विषयी रोष व्यक्त केला. बार्शी येथे घोंगडी बैठक ठेवावी अशी विनंती बार्शी मराठा बांधवांनी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे केली. आमदार राऊत यांनी जरांगे यांच्यावर आरोप केल्यानंतर जरांगे

(उर्वरित पान २ वर)

### गणरायाच्या आगमनाला जायकवाडी धरण १०० टक्के भरले: संभाजीनगरची पाण्याची चिंता दूर

## मराठवाड्यातील इतर धारणांमध्येही मुबलक पाणीसाठा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील हजारो गावांची तहान भागावणारे जायकवाडी धरण गणेश चतुर्थीच्या दिवशी १०० टक्के भरले आहे. यामुळे मराठवाड्यात पाण्याच्या टंचाईचा प्रश्न तात्पुरता तरी मिटला आहे. मराठवाड्यातील बहुतांश धरणे आता भरत आली असली तरी देखील राज्याच्या तुलनेत ६५.३५ टक्के धरण भरली आहेत. गेल्या वर्षी जायकवाडी धरणात ३२.६९



टक्के पाणीसाठा होता, आता १०० टक्के भरला असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून म राठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली असल्याने इतर धारणांमध्ये देखील पाणीसाठ्यात कमालीची वाढ झाली आहे. बीड जिल्ह्यातील माजलगाव धरणात २८ टक्के आणि मांजरा धरणात ७१.६६ टक्के पाणीसाठा आहे. हिंगोली येथील सिद्धेश्वर धरण देखील पूर्ण भरले आहे. गेल्या वर्षी या धरणात केवळ ४५.९३ टक्के पणी भरले होते. तसेच येथील येलदरी धरण ६५ टक्के भरले आहे.

### माझा लाडका बाप्पा वाजत गाजत आला!

## सव्वादोन लाख गणरायांची प्राणप्रतिष्ठापना



**मुंबई । प्रतिनिधी**

'गणपती बाप्पा मोरया'चा गगनभेदी जयघोष, वरुणराजाने अधूनमधून दिलेली सलामी, ढोल-ताशांचा दणदणाट, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत घरोघरी गणरायाचे आगमन होत आहे. शनिवारपासून पुढील ११ दिवस बाप्पा मुंबईकरांना आपल्या सेवेची संधी देणार आहे. सार्वजनिक मंडळांचे बाप्पा तर २ -३ दिवसांपूर्वीच मंडळात विराजमान झाले आहे.

शुक्रवारी सायंकाळपासूनच बाप्पाच्या आगमनाने मुंबईतील रस्ते फुलून गेले होते. भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम मायानगरीत झाला आहे. लहान-थोरांकडून मोठ्या भक्तिभावाने बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवासाठी मुंबई महापालिका सज्ज झाली असून, गणपतींच्या आगमनापूर्वी रस्त्यांची डागडुजी आणि कृत्रिम विसर्जन तलाव आदी सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. शनिवारी मुंबईत सुमारे १२ हजारांहून अधिक सार्वजनिक आणि दोन लाखांपेक्षा जास्त घरगुती गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. पावसामुळे शहर

(उर्वरित पान २ वर)

### नाल्या काढा ताई....

## प्रेगनंट म्हशीचे नीता अंधारेना पत्र





**क्रॉसलाईन**

**प्रती,**
**नीता अंधारे**
**मुख्यकार्यकारी अधिकारी**
**बीड नगर परिषद**
**पत्ता माहीत नाही**
**संपर्क – फोन उचलत नाहीत**

नीता ताई सप्रेम नमस्कार, एक स्त्री म्हणून मला तुमचा अभिमान, मानवाने प्राणी मात्रावर नेहमी जीव लावला आहे, आम्ही देखील तुमच्या लेकरा बाळाना दूध दिले आहे. म्हणून माणूस काय आणि आम्ही जनावरे काय आपण सगळे देवाचे जीव, गाईला माता समजता आनंद आहे नीताताई म ला किमान बहीण तरी समजून माझे आज ऐकून घ्या. झाले असे की तीन दिवसांपूर्वी माझा मालक मला घरी घेऊन जात असताना गांधी नगर मध्ये नाली दिसलीच नाही, का तर नगर परिषदेने लाइट लावल्या नाहीत बर ता काय सांगू, वरुण नाली समजल नाही मी अशी अंधारात पडली बाई, मला बाहेर निघताच येईना. माझा मालक शाहनवाज कुरेशी मोमीनपुरा येथे राहणारा आता तो ७० किलोचा मी दोनशे किलोची मला बाहेर काढणार कसा, भलते बघे जमा झाले बाई, कुणी शेपटी धर कुणी शिंगाला धरून ओढ मात्र तुमच्या म्हणजे नगर परिषदेच्या नाल्या बेंदाडाने तुडुंब भरलेल्या, नीताताई असे का नाल्या का बर काढत नाही, कुणी सांगितले का नाल्या काढू नका म्हणून , बाई काय सांगू माझ्या तोंडात नाकात घाण गेली, नुसती गर्दी मला काही खरे दिसेना, तेवढ्यात तो लोकपत्रकार कुठल्या कार्यक्रमाला निघालेला ताफा घेऊन, कुणीतरी म्हटले तावरे साहेब म्हैस पडली, मला वाटले कोण हा तावरे मात्र बाई तो निघाला हुशार त्याने मागवला दोरखंड मग सुफियान मनियर ने माझ्या पोटा खालून दोर टाकला मात्र उजव्या बाजूने दोर घ्यायचा कसा, त्या तावरे ने स्वतला नालीवर झोकून दिले आणि अर्धा लटकून त्याने नालीत हात टाकला आणि घालचा दोर घेतला, ात मी गाबन तुमच्या भाषेत ोधर, मग काय अली प्रदीप मैनूभाई फयाज बाबा यांनी दोर ताणला व माझे पाय वरती आले आणि मी पुटकून वरती आले. वाचलेच मी, नीताताई तुम्ही काय मी काय आपण दोघी स्त्री गाईला आई मानता मला बहीण म्हणून तरी उपकार करा. आणि हो मी ज्या नालीत पडले ती नाली काढावी म्हणून खासदार सोनवणे यांनी पत्र पाठवले होते म्हणे . हे बघा नीता ताई आपल्याला काय करायचे राजकारण आपण नौकर माणसे, खासदार लोकानी निवडून दिलेला पत्र आलं तर तुम्ही नाली काढायला पाहिजे ना, आता म्हणाल तुला काय करायचे, काय करायचे लागले होते ना बाई मी म रायला. आम्ही तुम्हाला दूध देनार आणि तुम्ही आम्हाला नालीत टाकणार, तुम्ही करा राजकारण आणि घ्या आमचे जीव, गई भईस पानी मे ते हेच का? निवडणूका नाही काही नाही, कुणी विचारायला नाही, सगळ्या सह्या म्हणे अर्थ पूर्ण वाटेने होतात, काय पगार कमी पडतो कुणास ठाऊक. फक्त मी म्हैस म्हणून माझ्या सोबत हा व्यवहार, मी हलक्या जातीत येते ना , जर मी गाय असते तर कशी काळजी घेतली

(उर्वरित पान २ वर)

CMYK

## ◆ संपादकीय...

# ‘मुख्यमंत्री योजनादूत’ बना आणि महिन्याला 10 हजार कमवा,

### सरकारचे तरुणांना अर्ज करण्याचे केले आवाहन



शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. यासाठी राज्यातील तब्बल ५० हजार तरुणांची भरती करण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत सरकारतर्फे प्रतिमहिना १० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. समाजातील वेगवेगळ्या घटकांच्या उत्थानासाठी राज्य सरकारतर्फे वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात. याच योजनांचा फायदा समाजातील प्रत्येक घटकाला मिळावा म्हणून सरकारतर्फे प्रयत्न केला जातो. म्हणजेच या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जातात. या योजनांची माहिती शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचावी यावर काम करणे गरजेचे आहे. याच कामाची जबाबदारी योजनादूतांवर सोपवली जाणार आहे. राज्यातील विविध योजनांची माहिती सामान्य जनतेला देणे, हे या योजनादूतांचे काम असणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. कसा कराल अर्ज– मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीने रचला महाविक्रम

### लोककल्याणकारी शिंदे सरकारची संवेदनशिलता; ४0 हजार रूग्णांचे वाचले प्राण; 3२1 कोटींहून अर्थसहाय्य वितरित



**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. गोरगरीब-गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी दिले आहेत. यानुसार आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने गेल्या २ वर्षं २ महिन्यामध्ये ४०,००० हून अधिक गोरगरीब-गरजू रुग्णांना एकूण ३२१ कोटी रूपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे.

एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारताच महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी या कक्षाची जबाबदारी दिली होती. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची ही गरज नाही पूर्णपणे ऑनलाईन प्रोसेस करून वैद्यकीय मदत मिळणार असल्याचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले. यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळविता येईल.

संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मध्ये अनेक-विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी दिली आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रूग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवहन कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

#### ▸ जीवनदान मिळालेली ’दुवा’च ब्रॅण्ड ॲम्बेसडर

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या ब्रॅण्ड म्बेसडर पदी अवघ्या एक वर्षाच्या दुवा नावाच्या चिमुकलीची निवड करण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील फहरीण मकुबाई आणि सादिक मकूबाई या मुस्लिम दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अवघ्या १३ दिवसांच्या बाळाचे प्राण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे वाचले होते. दरम्यान सहा महिन्यानंतर कोल्हापूर येथे झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमात सदर मुस्लिम दांपत्याने संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या हातात बाळाला सुपूर्द करत मुख्यमंत्री महोदय यांच्या दुवामुळे बाळाचे प्राण वाचले असल्याने या चिमुकलीचे नाव दुवा ठेवणार असल्याची इच्छा प्रकट केली. तब्बल एक लाख लोकांच्या साक्षीने मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी या बाळाला हातात घेऊन सदरच चिमुकलीचे नाव दुवा ठेवत असल्याचे जाहीर केले.**

#### ▸ मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष गरजूंसाठी आशेचा किरण : मंगेश चिवटे

**राज्यात शिंदे सरकार सत्तारूढ झाल्यापासून अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाला उर्जितावस्था दिली. या कक्षाच्या माध्यमातून हजारो रूग्णांचे प्राण वाचले. शेकडो कोटींचा निधी वितरीत करण्यात आला. अगदी पहिल्या दिवसापासून मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिला होता. कोणतीही रूग्ण मदतीपासून वंचित राहू नये यासाठी पुरेपूर प्रयत्न करू शकलो. महाराष्ट्रातील गरजू आणि गरजवंतांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष आशेचा किरण ठरला याचे समाधान वाटते, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली.**

# शहर स्वच्छ ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या गृहप्रकल्पासाठी छत्रपती संभाजीनगर महापालिका देणार जागा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेचे दोन हजारांहून अधिक कर्मचारी पहाटे ४ वाजेपासून परिश्रम घेतात. त्यातील बहुतांश कर्मचाऱ्यांना हक्काचे घर नाही. आजही हे कर्मचारी विविध स्लममध्ये राहत आहेत. त्यांना चांगल्या ठिकाणी घर मिळावे, यासाठी मनपा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

मनपा कर्मचाऱ्यांसाठी प्रशासनाने दिल्ली गेट, भडकल गेट, जकात नाका, सेव्हन हिल आदी ठिकाणी अत्यंत कमी प्रमाणात निवासस्थाने उभारली आहेत. यामध्ये बहुतांश ठिकाणी चतुर्थश्रेणी



कर्मचारी आहेत. शिवाय अनेक स्वच्छता कर्मचारी गांधीनगर, हर्षनगर, लेबर कॉलनी, शहाबाजार, शताब्दीनगर, आंबेडकरनगर, घाटी परिसरात राहतात. स्वत:चे घर नसल्याने हे कर्मचारी भाड्याच्या घरात राहतात. त्यांना चांगले हक्काचे घर मिळावे, यासाठी मनपा अधिकारी-कर्मचारी संघटनेने मागील आठवड्यात प्रशासकांकडे मागणी केली. याची दखल घेत प्रशासक जी. श्रीकांत यांनी पुढाकार घेतला. गुरुवारी नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. सहसंचालक मनोज गर्जे यांना या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देण्याची सूचना केली. मनपाला बांधकाम परवानगी देताना काही जागा मिनिटीअंतर्गत प्राप्त होते, अशा जागांचा शोध घेऊन तेथे गृहप्रकल्प राबविण्यासंदर्भात चाचपणी करण्याचे आदेश दिले.

#### ▸ बांधकाम व्यावसायिक प्रकल्प उभारून देणार

**सफाई कामगार म्हणून किती कर्मचाऱ्यांना स्वत:ची घरे नाहीत, हे अगोदर तपासण्यात येईल. एकूण कर्मचारी किती, ज्यांना घरांची गरज आहे, हे निश्चित झाल्यावर पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे. गृहप्रकल्पासाठी जागा मनपाची राहील. बांधकाम व्यावसायिकाने प्रकल्प उभारून द्यावा. त्यासाठी लागणारा खर्च कर्मचाऱ्यांनी कर्जाच्या माध्यमातून द्यावा, असे ठरले.**

#### ▸ २००५ मध्ये राबविली होती योजना

**महापालिकेचे तत्कालीन आयुक्त असीमकुमार गुप्ता यांनी सफाई कर्मचाऱ्यांसाठी सातारा येथे दीड एकर जागेवर ६२ कर्मचाऱ्यांसाठी गृहप्रकल्प राबविला होता. अवघ्या अडीच लाख रुपयांना कर्मचाऱ्यांना घरे देण्यात आली होती. एका खासगी बँकेकडून कर्ज दिले होते. आज या रो-हाऊसची किंमत १५ ते १८ लाख झाली. काही कर्मचाऱ्यांनी आज त्याच जागेवर दोन ते तीन मजले बांधले आहेत.**

◆ पान १ वरून पुढे...

## नाल्या काढा ताई..

असती, ती काय मी काय दोघी दूधच देतो ना? पण मला कसे वागवता, जनावरात देखील आता राजकारण आणले आहे, गाय माझीच मावस बहीण ती झाली देव असेल देखील मात्र मी म्हैस झाली त्यात माझ काय पाप. नीता ताई तुम्हाला मी थोरल्या बहिणीच्या रूपात पाहते , आता तरी लहान बहीण नालीत पडून मरेल असे वागू नका . भागवत तावरे तरी सर्वांना पुरणार आहे का, नाल्या रस्ते या मूलभूत गरजा आहेत तेवढ्या तरी पुऱ्या करा, आता माणसाना जनावरासारखे वागवणार असाल तर जणावराना माणसाच्या भूमिकेत यावे लागले आहे. आपण अधिकारी आहोत सर्व नेते पक्ष तुम्हाला समान हवेत, तो माझा विषय नाही मात्र याचे त्याचे ऐकून या भागात अमुक धर्माचे लोक आहेत तिकडे विकास नको, म्हणजे हा गैरसमज ठरावा, तुम्ही काय कायम बीडला नसाल मात्र तुमच्या मागे लोकानी नाव घेतले पाहिजे की ताईच होत्या बर, लई वाईट बोलतात . ताई साहेब फोन का उचलत नसता कारण किमान आमचे हंबर्डे तरी नपला ऐकायला जाईल व फुटला तर पान्हा फुटेल. असो खुप बोलले एका म्हशीने बोलावे ते किती, तरीही बरांच वेळ घेतला, आज म्हशीला वेळ दिला धन्यवाद तुमचीच लहानी बहीण...

**- काळी म्हैस**

(टीप - पत्र अनावृत असून नगर परिषद बीड प्रशासकीय तुंबनवर व्यंग आहे.)

◆ पान ४ वरून पुढे...

## गणेश उत्सवातून...

मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्कृतिक प्रकोष्टचे प्रमोद रामदासी, बालाजी जाधव, लालासाहेब पन्हाळे, मारुतीराव तिपाले, बद्रीनाथ जटाळ, वैजिनाथ नेवाळे, हनुमान मस्के, अण्णासाहेब मस्के, देवदत्त चौरे, राहुल रसाळ सर, विकास वाघ सर, शरद बडगे, अनिल शेळके, सचिन मस्के, महेश सावंत, बाबू बडगे, शंकर तुपे, लक्ष्मण काटे, विकास गव्हाणे, रवींद्र कळसाने, कल्याण पवार, बाळू गात,अजय ढाकणे, राकेश बिराजदार, शरद घोलप, अरुण गवळी यांच्यासह कार्यकर्ते, गणेश भक्त उपस्थित होते.

## सुषमाताई अंधारे यांनी...

शिवसेना नेत्या (ठाकरे गट) सुषमाताई अंधारे यांनी या निर्णयाचे सोशल मीडियावर पोस्ट करत स्वागत केले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून पूरबाधितांना आर्थिक मदत करत असल्याबद्दल या रचनात्मक व सकारात्मक कृतीचे सुषमाताई अंधारे यांनी स्वागत करत धनंजय मुंडे यांच्या सहनात प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांचेही अभिनंदन व आभार मानले आहेत.

## भारतीय जवान ...

### सर्व नेत्यांचा एकत्रित पाहणी दौरा परभणी

- ▸ दु. १२:०० : परभणी विश्रामगृह
- ▸ दु. ०१:०० : मौजे वझुर या गावी नुकसान पाहणी शेतकऱ्यांशी संवाद व परभणी कडे रवाना
- ▸ दु: ०४ : परभणी विश्रामगृह येथे पत्रकार परिषद होणार आहे.

## ह .भ.प.स्वप्नाली आंबटकर...

कार्याची दखल आयोध्या येथील रामायण प्रतिष्ठान महोत्सव आयोध्या उत्तर प्रदेश यांच्याकडून जाहीर करण्यात आला आहे, हा सदरील पुरस्कार वितरण सोहळा २७,२८, २९ सप्टेंबर २०२४ या तारखेला रामायण प्रतिष्ठान आयोध्या उत्तर प्रदेश, या ठिकाणी होणार आहे, यामध्ये महाराष्ट्रातील प्रतिष्ठित सामाजिक व्यक्तींचा सन्मान होणार आहे, यामध्ये विशेष सन्मान वारकरी संप्रदायातील ह भ प रामानाचार्य स्वप्नाली ताई आंबटकर, यांचा मानाचा तुरा आहे, आणि महाराष्ट्रातून पुणे जिल्ह्यातील कीर्तनकार म्हणून त्यांची निवड झाली आहे, त्यामुळे ह,भ,प स्वप्नाली ताई आंबटकर यांच सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे,

## बीड शहरातील गुंडांची ...

तपासावर आहे. तसेच नमुद इसमावर त्याने आपली वर्तनुक सुधारावी म्हणुन यापुर्वी उीझउ कलम ११० प्रमाणे अन्वये अनुक्रमे दिनांक २०/०९/२०२३ व दिनांक ११/०५/२०२४ रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालुच ठेवुन होता. त्याची बीड व गेवराई शहरात व हद्दीत प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता. सदर प्रकरणात बीड जिल्हा अधिकारी तथा न्यायदंड अधिकारी यांनी दिनांक०६.०९.२०२४रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम. पी.डी.ए. कायद्या अंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छ. संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध करणे बाबत आदेश पारीत केले आहेत. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.स्टे. गेवराई व पो.नी. स्था.गु.शा.बीड यांना दिल्या होत्या. त्यानंतर पो. नि. श्री. उस्मान शेख यांचे सुचनेवरुन पोउपनि मुरकुटे व त्यांचे टीमने सदर प्रस्तावित स्थानबद्ध इसमास दि. ०६.०९.२४ रोजी ताब्यात घेवुन पो.स्टे. गेवराई येथे हजर केले त्यांनतर पो. नि. गेवराई यांनी दिनांक ०६.०९.२०२४ रोजी सदर इसमास कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छ.संभाजीनगर येथे हजर करुन स्थानबध्द करणे कामी रवाना केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अविनशा बारगळ, अ.पो.अ. बीड, सचिन पांडकर, उप. विपो.अ. गेवराई निरज राजगुरु पो. नि. उस्मान शेख स्थागुशा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रविणकुमार बांगर, स. पो. नि. जंजाळ, पोह/राजु भिसे पोना / विशाल कांबळे सर्व पो.स्टे. गेवराई तसेच पो.उप.नि. मुरकुटे, स. पो. उप.नि. अभिमन्यु औताडे, कैलास ठोंबरे, तुळशिराम जगताप, राहुल शिंदे, मनोज वाघ, विकास वाघमारे व चालक राठोड सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे.

भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ कायदयाअंतर्गत आगामी गणेशउत्सव व विधानसभा निवडणुक संबंधाने कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी दिले आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

## कोपरांचे गुळ...

हे नेतृत्व समर्पित आहे मात्र त्यांना उमेदवारी दिलीच जाईल का अशी शंका आहे कारण मुस्लिम चेहरा पुढे करून जिल्ह्यात इतर ५ मतदार संघात मुस्लिमांचे मते घेता येऊ शकतील असा कयास असावा, यातून संपादक शेख तय्यब यांची चर्चा आहे त्यांना निवडून आणायचा धनंजय मुंडे यांचा आग्रह असल्याचा समजते. मात्र पक्ष एवढ्यावर न थांबता फारूक पटेल या सक्रिय नेत्याच्या कोपराला देखील गूळ लावला आणि यातून अमर नाईकवाडे, बरकत लाला, मोईन मास्टर यांच्या सारखे चेहरे पटेल साठी आग्रही आहेत. यात मित्र पक्ष असलेल्या सेनेचे दोन म्हणजे जगताप चव्हाण आणि भाजपचे म्हस्के यांची मोर्चे बांधणी वेगळी. त्यातले अनिल जगताप धनंजय मुंडे यांचे खास मित्र यामुळे धनंजय मुंडे नेमके कुठल्या मित्राला उमेदवारी देणार आणि कशी देणार हे येणारा काळ व त्यांनाच ठाऊक. उमेदवारी मिळेल एकाला आणि स्वतच्या पक्षातील हेच कोपराचे गूळ बंडाचे मूळ ठरतील का? आष्टी मध्ये बाळासाहेब आजबे कायम राहतील असे बोलले जाते मात्र मतदार संघ भाजपला जाईल आणि त्यात धोंडे का धस असा पेच तिथे असणार आहे.

## खूप दिवसांपासून रखडेल्या...

संच घेतलेल्या शेतकऱ्यांना ६२ कोटी रूपये, २०२२-२३ मध्ये ठिबक संच घेतलेल्या शेतकऱ्यांना ३० कोटी रूपये आणि २०२३-२४ मध्ये ठिबक संच घेतलेल्या शेतकऱ्यांना या अनुदानाचे वाटप केले जाणार आहे. तर सर्वाधिक रक्कम ही जळगाव जिल्ह्यासाठी जाणार असून येथील शेतकऱ्यांना ३१ कोटींचे अनुदान मिळणार आहे.

राज्य सरकारने १२३ कोटींचा निधी मंजूर केला असला तरी हा निधी केंद्र शासनाच्या योजनांकरता पूरक निधी म्हणून वापरला जाणार असल्याची माहिती आहे. यामुळे ठिबकचे बऱ्याच दिवसांपासून रखडलेले अनुदान आता शेतकऱ्यांना मिळणार आहे.

## परळीत सरस्वती नदीच्या...

व दिल्यास दिला होता तसेच प्रशासनाला तात्काळ मदत करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

शासनाच्या नियमानुसार पुराच्या पाण्याने नुकसान होऊन घरातील भांडी कपडे धान्य आदींचे नुकसान झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपये मदत दिली जाते, शासनाच्या बरोबरीने किंबहुना त्याहूनही दुप्पट मदत नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने धनंजय मुंडे यांच्याकडूनही दिली जात आहे.

परळी वैजनाथ शहरातील बरकत नगर, रहिमत नगर, भीमा नगर, स.क्र.७५ यांसह विविध भागातील बाधित कुटुंबीयांना यामुळे दिलासा व आधार मिळणार आहे. या दोन्ही मदतीचे रोखीने धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत रविवारी एकत्रितपणे दुपारी एक वाजता श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवाच्या स्व.पंडित अण्णा मुंडे सभामंडपात वितरण करण्यात येणार असल्याची माहिती नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मिक अण्णा कराड यांनी दिली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल...

कुठलाही उपाय दिसत नसे. तेव्हा आज ज्याप्रकारे ईडी सक्तीची वसुली करते. त्याचप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळी काही लोकांकडून सक्तीची वसुली केली. हिंदवी स्वराज्यासाठी जो कर भरायला हवा होता, त्याची महाराजांनी सक्तीची वसुली केली, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, २२ जानेवारी रोजी जेव्हा अयोध्येत राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला होता. त्या सोहळ्यात बोलत असताना गोविंददेव गिरी महाराजांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा श्रीमान योगी असा उल्लेख केला होता.

## "फितूरीचे संस्कार...

यांनी देखील राऊत यांचे आव्हान स्वीकारल्याचे जाहीर केले. दरम्यान, शनिवारी अंतरवाली सराटीत थेट बार्शीतून तब्बल ३०० गाड्या दाखल झाल्या. यावेळी झालेल्या बैठकीत बार्शीतून आलेल्या मराठा कार्यकर्त्यांनी आमदार राऊत यांच्याबद्दल रोष व्यक्त केला. त्यानंतर जरांगे यांनी आमदार राऊत यांच्यावर धारदार टीका केली, तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही गंभीर आरोप केले. जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणात बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्यावर टीका करत म्हटले की, राऊत यांनी फितूरीचे संस्कार दाखवले आहेत. ते मराठा समाजात फूट पाडण्याचं काम करत आहेत. त्यांनी मुख्यमंत्री शिंदे आणि शंभूराज देसाई यांच्याकडेही नाराजी व्यक्त करत, मुख्यमंत्री शिंदे साहेबांचं नाव खराब करण्यात येत आहे, आणि याचं उत्तर त्यांना दिलेच पाहिजे, असे सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करत म्हटले की, देवेंद्र फडणवीस मराठ्यांना फसवण्याचं काम करत आहेत. त्यांनी मराठा समाजात दंगल घडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, श्रीमंत लोकांना आरक्षणाची गरज नाही. त्यांना फक्त राजकारणासाठी मराठा समाजाची गरज आहे.

आमदार राजेंद्र राऊत यांनी जरांगे पाटील यांच्यावर पत्रकार परिषदे काही आरोप केले. याला जरांगे पाटील यांनी प्रत्युत्तर देत, तुला वेळ आल्यावर कळेल, देवेंद्र फडणवीसचे ऐकून तू किती चिखलात फसला आहेस, अशी सडकून टीका केली. तसेच मी राजगादीला किती मानतो हे उदयनराजे महाराज, कल्पना राजे मासाहेब आणि छत्रपती संभाजीराजेंना माहिती आहे. तू कशाचाही शपथ घेतो, आम्हाला प्रश्न विचारणारा तू कोण? अशा शब्दात राऊत यांचा समाचार घेतला.

## सव्वादोन लाख..

आणि उपनगरांतील अनेक रस्त्यांवर खड्डे पडल्याने आगमन आणि विसर्जन मिरवणुकांमध्ये अडथळे येणार असल्याच्या तक्रारी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह नागरिकांनी केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर पालिकेने अनेक रस्त्यांवरील खड्डे भरले आहेत, तसेच चौपाट्यांसह ६९ नैसर्गिक जलस्रोत, २०४ कृत्रिम तलावांत गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी सर्व व्यवस्था सज्ज ठेवली आहे.

## ◆ थोडक्यात...

### जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी; अनिलदादा जगताप यांच्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यात सर्वत्रच दोन दिवस मुसळधार पावसाने थैमान घातले असल्याने लाखो शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. सोयाबिन, तूर, मुग, उडीद, कापूस इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून संसार उघड्यावर आला आहे. काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेली आहेत. उभी पिके वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला आहे. जमिनी खरडून गेल्याने पावसाचा मोठा फटका बसला आहे. तसेच अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हाप्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी यांना पत्रकाद्वारे केले आहे. याबरोबरच बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा होण्याचा धोका आहे. सदरील गावात ८० ते ८५ कुटुंबे असून ५०० ते ६०० लोक सध्या त्याठिकाणी वास्तव्यास आहेत. या गावाची रचना, वरच्या बाजूला डोंगर व खालच्या बाजूला नदी आणि मधोमध गाव अशाप्रकारची आहे. त्यामुळे तेथे भूस्खलन होण्याचा धोका सातत्याने जाणवत आहे. या गावातील लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने या गावाचे पुनवर्सन करण्यात यावे. तसेच बीड शहरानजीक असलेले बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना नगरपालिकेच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. याबाबत देखील जिल्हा प्रशासनाने उपयोजना कराव्यात. शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेअभावी नागरिकांच्या राहत्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून दैनंदिन जीवन, आरोग्य तसेच इतर प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. याबाबत नगरपालिकेच्या वतीने नाली स्वच्छता करून नागरिकांना रस्ते व सोयीसुविधा देण्यासाठी यंत्रणेला आदेशित करावे अशा विविध सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिल्या आहेत.

### मा.आ.भीमराव धोंडे यांच्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन नर्सिंग कॉलेजला शासनाची मान्यता




**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आष्टी या संस्थेस नवीन नर्सिंग कॉलेजला शासनाची मान्यता मिळाली आहे.

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीम राव धोंडे यांनी मतदारसंघात सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय केली आहे. प्रत्येक वर्षी नवनवीन शिक्षणाची सोय करण्यात येत आहे. या नविन म हाविद्यालय मुळे आष्टीच्या वैभवात भर पडली आहे व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आरोग्य सेवेत काम करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे यासाठी आता दुसऱ्या शहरात जाण्याची आवश्यकता लागणार नाही. आष्टी येथील आनंद शैक्षणिक संकुलात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कृषी, अन्नतंत्र,फार्मसी, पॅरामेडीकल,कृषीतंत्र,इंजिनिअरिंग तसेच वैद्यकीय शिक्षणाबरोबर आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नर्सिंगच्या शिक्षणाची सोय झाली आहे. शेतकरी शिक्षण संस्थेस नर्सिंग कॉलेजला महाराष्ट्र शासन यांची मान्यता व महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांचे संलग्निकरण मिळाले आहे . आष्टी येथील आनंद शैक्षणिक संकुलात नर्सिंग कॉलेज ला परवानगी मिळाली असून त्यामुळे बीड व नगर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील विद्यार्थांचे नर्सिंग होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. सन २०२४ -२०२५ साठी प्रवेश सुरू झाले असुन ज्या विद्यार्थ्यांना नर्सिंग कॉलेजला प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे. तरी आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातिल सामाजिक शैक्षणिक विद्यार्थी व पालक यांच्या कडून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ. भीमराव धोंडे व संस्थेचे सहसचिव डॉ अजय दादा धोंडे यांचे अभिनंदन होत आहे तरी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यानी खालील क्रमांकावर संपर्क साधावा ९४२३४७१३९५, ९४२१३३९७०४, ८३८०८३०३०६.

### लोकमान्य टिळक महाविद्यालयात सामाजिक शास्त्राचे उद्धाटन



**वडवणी । प्रतिनिधी**

येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात शिक्षक दिनाचे औचित्य साधून सामाजिक शास्त्राचे उद्धाटन बलभीम कॉलेज बीड येथील प्रा. डॉ. काळे यांच्या हस्ते करण्यात आले . प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री. पंजाबराव मस्के हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना समाजभिमुख व पूरक असे कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. काळे यांनी शिक्षक कसा असावा, त्यांचे आचरण शुद्ध असावे व शिक्षकांनी आदर्श विद्यार्थी घडवावेत असे सांगितले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे उपराष्ट्रपती जरी असले तरी ते सर्वप्रथम उत्कृष्ट शिक्षक असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी महान व्यक्तीचे आत्मचरित्र वाचून त्यातून प्रेरणा घेण्याचे त्यांनी आवाहन केले. उपप्राचार्य प्रा. डॉ.कुलकर्णी यांनी विद्यार्थी जर साक्षर झाला तर देश साक्षर होईल त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यास करून स्वतःचा व देशाच्या विकासास हातभार लावण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. साळुंखे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. भालेराव यांनी केले तर आभार प्रा. डॉ. तांदळे यांनी मानले.हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. के .एम .पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात श्री गणरायाचे आगमन

**▸ भक्तांची झुंबड**

विघ्नहर्त्याला घरी नेताना आबालवृद्धांचा उत्साह अधिक दिसून आला. दुपारी गणेशमूर्ती नेण्यासाठी भक्तांची बाजारात झुंबड उडाली होती. शहरातील मिठाईच्या दुकानात बाप्पांसाठीचा नैवेद्य खरेदी करण्यासाठी भक्तांनी गर्दी केली. जास्वंद, गुलाब, केवडा, मोगरा, शेवंती, झेंडूची फुले, दुर्वा, धूप, अगरबत्ती यासह पूजा साहित्य खरेदी करण्यासाठी देखील भक्तांची गर्दी झाली होती. गणेशोत्सावाच्या खरेदीसाठी भक्तांच्या तुफान गर्दीने शहरातील बाजारपेठांचे रस्ते फुलले होते.

**▸ पारंपारिक वाद्याला पसंती**

यंदा गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांना पसंती दिल्याचे दिसून आले. शहरातील महत्वाच्या गणेश मंडळांसह तालुक्यातील इतर गणेश मंडळांनीदेखील ढोलताशा पथकांना आमंत्रित करत श्रींची मिरवणूक काढली. त्यामुळे यंदा बाप्पांच्या आगमनाच्या मिरवणुकीत डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्यांना पसंती देण्यात आल्याचे दिसून आले. दुपारनंतर मंडळांच्या मिरवणुकांनी शहरातील परिसर गजबजून गेला.

**▸ बाप्पांची 'सोशल' वारी**

बाप्पांचे घराघरांत आणि सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींचे स्वागत धूमधडाक्यात करण्यात आले. शहरातील या चैतन्यमय वातावरणात सोशल मीडियावरही बाप्पांची स्वारी ऐटीत असल्याचे दिसून आले. गणेशचतुर्थीच्या निमित्ताने सकाळपासूनच शुभेच्छांचा वर्षाव सोशल मीडियावर सुरू होता. बाप्पांच्या विविध रुपांचे फोटो शेअर केले जात होते.

**▸ पोलिसांचे चोख नियोजन**

गणेशमूर्ती खरेदीसाठी भक्तांची होणारी गर्दी लक्षात घेता सर्वत्र पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. शहरातील मुख्य बाजारपेठेसह इतरत्र पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांचा बंदोबस्त लावण्यात आला वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून रस्त्यावर मोठी वाहने लावण्यास मनाई करण्यात येत होती. गणपती बाप्पांचे स्वागत करण्यात दंग असलेल्या सुरक्षेसाठी पोलिसांनी चोख नियोजन केल्याचे दिसले.

### ● बाप्पाच्या जयघोषात वडवणी दुमदुमली..!





**वडवणी । प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' च्या जयघोषात गुलालाची उधळण अन् ढोल-ताशांच्या गजरात वडवणीकरांचे पाहुणचार स्वीकारण्यासाठी लाडक्या गणपती बाप्पांचे आगमन झाले आहे. बाप्पांना घरी घेऊन जाण्यासाठी गणेश भक्तांनी एकच गर्दी केली. गणरायाच्या स्वागताने गणेशभक्त भारावून गेले. गणेशोत्साला सुरुवात झाल्याने वातावरणात चैतन्य संचारले अवघे शहर गणेशमय झाले होते घरोघरी श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना सायंकाळी उशिरापर्यंत करण्यात आली पुढील १० दिवस गणेश भक्तांच्या उत्साहाला उधाण येणार आहे.

लाडक्या गणपती बाप्पांची वाट पाहणाऱ्या भक्तांनी सकाळपासूनच बाजारपेठेत गर्दी केली. सकाळी बाप्पांची स्वारी भक्तांसोबत घरोघरी विराजमान होण्यासाठी निघाली. गणरायांचे स्वागत करण्यासाठी लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. गणेशमूर्ती घेतल्यावर गुलाल आणि फुलांची उधळण करत बाप्पांच्या नामाचा जयघोष केला जात होता. शहरात सर्वत्र घरगुती गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना जल्लोषात करण्यात आली. नेहमीप्रमाणे यंदाही घरोघरी विराजमान होणाऱ्या बाप्पांचे स्वागत ढोल-ताशांच्या गजरात करण्यात आले. ''आले आले हो गणराज आले'' म्हणत प्रत्येक जण लाडक्या दैवताला घरी घेऊन गेले. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेशमूर्तींचे स्वागत दुपानंतर करण्यात आले. गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दांडगा असल्याचे दिसून येत होते. सायंकाळी उशिरापर्यंत शहरातील गणेश मंडळांच्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा सुरू होता. बाप्पांच्या आगमनाने शहरात नवचैतन्य संचारले.

# वेळगिवे धनगरवाडीत दोन एसटी बसची धडक, चालक वाहकासह १५ जखमी

**विजयदुर्ग । प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळ विजयदुर्ग आगाराची विजयदुर्ग-पणजी बस आणि कणकवली-विजयदुर्ग बस यांची विजयदुर्ग तरळा मार्गावरील वेळगिवे धनगरवाडी येथे समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात चालक वाहकासह एकूण १५ प्रवाशांना गंभीर व किरकोळ दुखापत झाली आहे.




सदरची घटना सकाळी ७.४५ च्या सुमारास वेळगिवे धनगरवाडी या ठिकाणी घडली. अपघातातील जखमींना कासार्डे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर यातील ९ जणांना उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. जखमींवर उपजिल्हा रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आल्याची माहिती कणकवली उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.पंकज पाटील यांनी दिली. यावेळी त्यांचे सहकारी डॉ.विद्याधर हनमंते, डॉ.सचिन डोंगरे, डॉ.रेड्डी व सहकाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावून आपत्कालीन पथकाच्या सहाय्याने तातडीने औषधोपचार केले. या अपघातात शकील शब्बीर शेख (वय २७, विजयदुर्ग), नामदेव काशीराम गोरुले (वय ६४, गवाणे), गणेश नामदेव मुळे (वय ३७), प्रमोद नथुराम पाळेकर (वय ४०, विजयदुर्ग), अक्षता सुनील हातगे (वय २०, पाटगाव), असद अंकुश चव्हाण (वय ३५, सौंदाळे ), नासिर अहमद पठाण (वय ३३, विजयदुर्ग), निलेश गंगाधर इंगोले (वय ३२, विजयदुर्ग), पवन प्रभाकर मगर (वय ३५, विजयदुर्ग ), धनश्री अंकुश चव्हाण (वय १६, सौंदाळे), स्वाती अंकुश चव्हाण (वय ३८, सौंदाळे), मानसी अमोल दुर्गिष्ट (वय १६, सौंदाळे), जयश्री रमाकांत मि ठबावकर (वय ५५, सौंदाळे) या जखमी अपघातग्रस्तांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती सम जतात विभाग नियंत्रक अभिजीत पाटील कणकवली यांचा अभियंता सुजित डोंगरे, आघाडी व्यवस्थापक अजय गायकवाड कणकवली, विवेक जमाले विजयदुर्ग यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमींची विचारपूस केली.

### नांदेडमधील हॉटेल व्यावसायिकाच्या मृत्यूचे गुढ उलगडले; मुलानेच काढला वडिलांचा काटा

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडमधील हॉटेल व्यावसायिकाच्या मृत्यूचे गुढ उलगडले असून मुलानेच त्याच्या वडिलाच्या काटा काढल्याचा धक्कादायक प्रकार चौकशीतून उघडकीस आला आहे. घरघुती वादातून ही हत्या करण्यात आल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे.

मुख्य आरोपी मुलासह इतर दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर सुपारी घेणारा आरोपी फरार आहे. नांदेडमध्ये १ सप्टेंबर रोजी हॉटेल व्यासायिक शेख युनूस शेख पाशा यांची राहत्या घरी हत्या करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवत सहा दिवसात ३ आरोपींना ताब्यात घेतले. यात आरोपी मुलाचा देखील समावेश आहे. तर इतर




दोन जणांनादेखील ताब्यात घेतले आहे.

दोन लाख रुपयांची सुपारी देऊन वडिलांचा काटा काढण्याचे षडयंत्र रचले. वडील आणि मुलाम ध्ये रोज छोट्या छोट्या गोष्टी वरून वाद होत होते. मुले वडिलांना सम जावण्याचा प्रयत्न करत होते. मात्र वाद वाढत गेल्याने आरोपी मुलगा शेख अजमद शेख इसाक याने वडिलांची हत्या घडवून आणली. पोलिसांनी आरोपी शेख अजमद शेख इशाक याच्यासह इतर दोघांना ताब्यात घेतले आहे. सुपारी घेणारा आरोपी मात्र अद्याप फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

### मसलगा प्रकल्पाच्या पाळूवर दीडशे फुटाची भेग; सहा दरवाज्यांतून विसर्ग, नागरिकांत भीती

**निलंगा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मसलगा मध्यम प्रकल्पाच्या पाळूवर जवळपास दीडशे फुटाची भेग पडल्याने तलाव फुटेल, या भीतीने परिसरातील गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खबरदारी म्हणून प्रशासनाने शुक्रवारी सहा गेट १० सेंटीमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे.

मागील काही दिवसांपासून मसलगा मध्यम प्रकल्पाच्या कारभाराचे धिंडवडे उडत असून, आठ दिवसांपूर्वी तलाव १०० टक्के भरून धोक्याची पातळी ओलांडत असतानाचे फोटो एका शेतकऱ्याने समाज माध्यमातून व्हायरल केल्यानंतर खडबडून जागे झालेल्या प्रकल्प प्रशासनाने दोन दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग सुरू केला. ही घटना ताजी असतानाच मसलगा मध्यम प्रकल्पाच्या पाळूवर जवळपास दीडशे फ ुटाची लांब भेग पडल्याचे येथील शेतकरी तुळशीदास साळुंके यांच्या निदर्शनास चार दिवसांखाली आली होती. त्यादिवशी भेगेची रुंदी चार इंच इथपर्यंत होती. मात्र तिच भेग शुक्रवारी चार इंचावरून दहा इंचापर्यंत वाढल्याने घाबरून गेलेल्या शेतकरी साळुके यांनी याच ठिकाणी उभारून व्हिडीओ करत चार दिवसांत एवढी मोठी भेग वाढत जात असताना प्रकल्प प्रशासन झोपा काढत आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# पूजा खेडकरवर केंद्र सरकारची मोठी कारवाई; आयएएस सेवेतून केले बडतर्फ

**मुंबई । प्रतिनिधी**

वादात सापडलेल्या माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर हिला केंद्र सरकारने भारतीय प्रशासकीय सेवेतून बडतर्फ केले आहे. पूजा खेडकर हिच्यावर सेवेत तिची निवड सुनिश्चित करण्यासाठी इतर मागासवर्गीय आणि अपंगत्व कोट्याचे फायदे चुकीच्या पद्धतीने मिळवले असल्याचा आरोप आहे.

केंद्र सरकारने ६ सप्टेंबर २०२४ रोजीच्या आदेशाद्वारे खेडकर हिला आयएएस नियम, १९५४ च्या नियम १२ अन्वये तात्काळ प्रभावाने भारतीय प्रशासकीय सेवेतून बडतर्फ केले आहे. केंद्र सरकारच्या नियम ानुसार, जो व्यक्ती पुर्नपरीक्षेत उत्तीर्ण झालेला नाही किंवा जो व्यक्ती परीक्षा दिल्यानंतरही भरतीसाठी अपात्र आहे किंवा तो सेवेचा सदस्या होण्यासाठी अयोग्य आहे, अशांना केंद्र सरकार सेवेतून काढून टाकू शकते. दरम्यान, पूजा खेडकरला २६ सप्टेंबरपर्यंत अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. मात्र तिने तिच्यावरील आरोप फेटाळून लावले आहेत. तिने ५ सप्टेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सांगितले की, तिचे एक अपंगत्व प्रमाणपत्र बनावट



असल्याची शक्यता पोलिसांनी केली आहे. मात्र आता केंद्र सरकारच्या बडतर्फीच्या निर्णयामुळे पूजा खेडकरच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पूजा खेडकर ही २०२३ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (णझडउ) परीक्षेत तिने ८४१ वा क्रमांक पटकावला होता. यानंतर काही महिन्यापूर्वी तिची सहायक जिल्हाधिकारी अधिकारी म्हणजेच प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून पुणे जिल्ह्यात नियुक्ती करण्यात आली होती. पण प्रशिक्षणाच्या काळातच पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अवास्तव मागण्या केल्यामुळं आणि अरेरावी वर्तनामुळं तिची वाशिम इथं बदली करण्यात आली.

# नरेंद्र मोदींनी माफी मागितली, त्यांच्या मनाचा मोठेपणा : कालीचरण महाराज

**नाशिक। प्रतिनिधी**

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यावरून सत्ताधारी विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत होत्या. पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने करण्यात येतोय तर वाऱ्याचा प्रचंड वेग असल्याने पुतळा कोसळल्याचे स्पष्टीकरण सत्ताधारी पक्ष देत राहिला.

संपूर्ण महाराष्ट्रात शिवरायांचा पुतळा कोसळल्याच्या दुर्घटनेवरून रोष निर्माण झालेला असताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वप्रथम महाराष्ट्राची माफी मागितली. दुसरीकडे महाराष्ट्र दौऱ्यावर आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी जनतेची माफी मागितली. यावरच बोलताना कालीचरण महाराज यांनी मोदींचे मन मोठे असल्याचे सांगत नेत्यांना दोषी धरणे चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले. नाशिक शहरात गणपती बाप्पाच्या आगमनाचा जोरदार उत्साह



पाहायला मिळतोय. बालाजी फाऊंडेशनच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर कालीचरण महाराज यांच्या महाकाल शिव तांडव नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना त्यांनी शिवरायांच्या पुतळा कोसळल्याच्या मुद्द्यावर मत मांडले.

शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे ही दुर्घटना मनाला अतिशय वेदनादायी आहे. मला असे वाटते की मुख्य नेत्याला दोषी धरण्यापेक्षा पुतळा बनवणारा ५०० टक्के दोषी आहे. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागितली, हा त्यांचा मोठेपणा असल्याचे कालीचरण महाराज म्हणाले. तसेच विरोधकांचे काम राजकारण करणे आहे. हिंदूंनी संघटित होणे हेच अंतिम काम असल्याचेही ते म्हणाले. राजकारणात प्रवेश करण्याबाबतही कालीचरण महाराज सकारात्मक असल्याचे दिसले. मला नक्कीच राजकारणात यायला आवडेल, असे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ४ डिसेंबर २०२३ रोजी या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले होते. शिवछत्रपतींचा पुतळा कोसळल्यामुळे राज्यात शिवप्रेमींम ध्ये रोष निर्माण झाला होता.

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ०८ सप्टेंबर २०२४ ● पान ४







# वाजत गाजत गणपती बाप्पांचे आगमन......






बीड शहरात हिंदु रितुरिवाजाप्रमाणे गणोशत्सवासाठी गणेश मुर्तीची स्थापना करण्याहेतु लागणाऱ्या सजावटीचे सामान, फुले, प्रसादाचे साहित्य, श्रींची मुर्ती साठी भाविकांची दिवसभर बाजारपेठेत चांगलीच गर्दी दिसुन आली. हर्षोउल्हासात घरोघरी श्रीगणेश विराजमान झाल्याचे दिसुन आले. मोठ्यांसोबत लहान गणेशभक्तांचा गणोशत्सव प्रारंभ झाल्याचा आनंद बघण्यासारखा आहे.



*बीड : शहरात क्षीरसागर कुटुंबियांच्या निवासस्थानी श्रींची स्थापना करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, डॉ.दीपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर आदींची उपस्थिती होती. क्षीरसागर कुटुंबियांकडून गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.*

# गणेश उत्सवातून सांस्कृतिक व एकतेची ऊर्जा मिळते : राजेंद्र मस्के

**▸राशी निवास्थानी श्री गणेशची स्थापना ..!**



**बीड ।** प्रतिनिधी

बुद्धीदाता व कलेचा अधिपती श्री गणेशाचा पारंपारिक गणेश उत्सव देशभरात उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्रात श्री. गणेश उत्सवाच्या माध्यमातून परंपरा व संस्कृतीचे मुळे खोलवर रुजली आहेत. अबाल वृद्ध व अठरा पगड जातीतील माणूस या उत्साहात आदराने व जोमाने सामील होतो. पारंपारिक गणेश उत्सवातून तरुणांच्या बुद्धीला विस्तार व कल्पकतेला वाव मिळतो. नवीन ऊर्जा प्राप्त होते. अशा आनंददायी गणेश उत्सवाच्या निमित्ताने सर्व गणेश भक्तांना मनपूर्वक शुभेच्छा देऊन, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सहकुटुंब विधिवत पूजन करून, श्री गणरायाची राशी निवास्थानी आपल्या सवंगड्यांच्या साक्षीने स्थापना केली. यावेळी कामगार (उर्वरित पान २ वर)



*गणपत्ती बप्पाचे आगमन... शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या निवासस्थानी गणरायाचे आगमन कुटुंबीया समवेत गणेशाची पूजा करून स्थापना केली व महाराष्ट्रातील शेतकरी कष्टकरी समृद्ध व सुखी संपन्न कर आशी गणरायाचरणी प्रार्थना केली...!!*

## ◆ थोडक्यात...



*दिनेशउर्फ (दिपक )शहादेव ढेंगे रा छ शिवाजी नगर बीड, यांची लहान मुलगी आराध्या वय ३ वर्ष सध्या बीड च्या डॉ शिंदे सरांचे लाईफ लाईन हॉस्पिटल मध्ये ६0 टक्के गरम पाणी अंगावर पडल्या मुळे त्वचा भाजली गेले आहे, व त्यामुळे ऍडमिट आहे, सदरील दिनेश हा गरीब कुटूंबातील असल्यामुळे त्याला मदतीची गरज आहे, ज्यांना मदत करायची आहे, अश्या सामाजिक सेवा भावी संस्था , ट्रस्ट , धार्मिक संस्थान, गणेश मंडळ व सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, यांनी ९0७५५५९५५९ या नंबर वर फोन पे ला मदत करावी ही विनंती, तुमचा एक रुपये सुद्धा मदतीला येऊ शकतो फुल नाही तर फुलाची पाकळी म्हणून मदत करा...!! फोन पे नंबर ९0७५५५९५५९*

## बीड शहरातील गुंडांची हर्सुल कारागृहात रवानगी



**बीड ।** प्रतिनिधी

गणेशउत्सावाच्या पार्श्वभुमीवर MPD कायद्याअंतर्गत बीड शहरातील एका धोकादायक गुंडाची हर्सल कारागृहात रवानगी केली. बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था व कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊकायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे गणेशउत्सव व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर योजिले आहे. त्या अनुषघांने पो.नि.प्रविण कुमार बांगर पोलीस ठाणे गेवराई यांनी दिनांक ०९.०७.२०२४ रोजी भीमा लक्ष्मण मस्के वय ४२ वर्षे रा. पेठ बीड ता. जि. बीड याचे विरुद्ध चझऊ कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे गेवराई, तलवडा, पेठ बीड, शिवाजीनगर, धारुर. वडवणी, येथे चोरी करणे, चोरीच्या मालाची हेराफेरी करणे, घरफोडी करणे, पुरावा नष्ट करणे, जबरी चोरी करणे, रस्ता आडविणे, खुनाचा प्रयत्न करणे, गैर कायदयाची मंडळी जमविणे, दंगा करणे, दुखापत करणे वगैरे स्वरुपाचे एकुण ०९ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०५ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ०४ गुन्हे पोलीस (उर्वरित पान २ वर)

# सुषमाताई अंधारे यांनी मानले धनंजय मुंडे यांचे आभार

**परळीतील पूरबाधितांना थेट आर्थिक मदत केल्याबद्दल सुषमाताईंनी सोशल मीडियावर धनंजय मुंडे यांचे केले कौतुक**

**परळी ।** प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ शहरात मागील आठवड्यात पुराने बाधित झालेल्या जवळपास ५७० पेक्षा अधिक कुटुंबांना पालकमंत्री धनंजय मुंडेंनी ते अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत रविवारी देण्याचे घोषित केल्यानंतर आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमाताई अंधारे यांनी धनंजय मुंडे यांच्या या निर्णयाचे स्वागत करत आभार मानले आहेत.

मागील आठवडयात झालेल्या अतिवृष्टीमुळे परळी शहरातील सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे रहिमत नगर, बरकत नगर, भीमा नगर इत्यादी भागातील बऱ्याच घरांमध्ये पाणी शिरून कपडे, धान्य, भांडी आदींचे नुकसान झाले होते. त्यानंतर तिथे धनंजय मुंडे यांनी जाऊन पाहणी करत नागरिकांना दिलासा दिला होता.

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शासकीय नियमानुसार तहसील कार्यालयाकडून ता बाधित कुटुंबांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत करण्यात येत असुन या मदतीच्या दुप्पटीने धनंजय मुंडे यांनी या कुटुंबांना मदत जाहीर केली असुन, (उर्वरित पान २ वर)

# गणेशोत्सव निमित्त लिंबागणेश येथे पोलिसांचे पथसंचलन



**लिंबागणेश ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभुमी लिंबागणेश येथे आज मयुरेश्वर गणरायाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना सरकार वाड्यात करण्यात आली.या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या हेतुने पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ व उपविभागीय अधिकारी कम लेश मिना यांच्या मार्गदर्शनात नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या नेतृत्वाखाली आज दि.७ शनिवार रोजी दुपारी लिंबागणेश येथे पथसंचलन करण्यात आले.सदर पथसंचलन पोलिस चौकी येथुन सुरूवात होऊन बसस्थानक, हनुमान चौक, वाणी चौक, ढवळे चौक, सरकारवाडा परत पोलिस स्टेशन येथे सांगता झाली. पथसंचलनामध्ये पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकी अंमलदार डोंगरे, राऊत, मुंढे, ढाकणे तसेच ईतर पोस्टचे १७ पोलिस कर्मचारी व २० होमगार्ड सहभागी होते. गणेशोत्सव दरम्यान स्थापनेपासून गणेश विसर्जन पर्यंत कडेकोट पोलिस बंदोबस्त राहणार आहे

## श्री नारायण मा. व उ.मा. विद्यालय येथे शिक्षक दिन साजरा

**बीड ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, प्राचार्य तथा संस्थेचे सचिव अमोल काळे सर, सौ. राजश्री काळे /पिंगळे मॅडम , प्राध्यापक घरत अशोक सर , प्रा.श्री मस्के जी.बी, श्री इनकर बी .जे, प्रा. श्री पौळ डी.बी, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर , करपे सर ,कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, प्रा. मुरमुडे ए .एन , हे होते. प्रथम मान्यवरांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन झाले.

# भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौरा

**शेतकरी व सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे**



**आष्टी ।** प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये गेल्या काही दिवसात पावसाने थैमान घातल्याने काढणीस आलेली खरिपाची पिके पाण्याखाली गेल्याने बळीराजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सरकार शेतकऱ्यांना धीर देत नसल्याने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून धीर देण्यासाठी भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेतकरी आणि सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश दादा खोटे यांनी दि. ७ रोजी माध्यमांशी बोलताना केले आहे.

गेल्या काही दिवसापासून मराठवाडा अतिवृष्टी पावसाने झोडपल्याने शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत त्यामुळे काढणीस आलेली पिके हातची गेल्याने शेतकरी उध्वस्त झाला आहे. त्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दुष्काळामुळे मराठवाड्यामध्ये वर्षांनुवर्षे भीषण पाणी टंचाई निर्माण होत असते पण या भागात सध्या ओला दुष्काळ पडला असल्याने शेतकरी परत एकदा हातबल झाला आहे याची पाहणी करण्याकरता परभणी येथून दिनांक ९ पासून स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे भोसले , प्रहार पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी ,भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय नारायण अंकुशे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश खोटे यांनी दिली आहे.

**हा दौरा पुढीलप्रमाणे असणार आहे.**

- स. ०८:३० : उंचाडा, ता. हदगाव
- स. ०९:०० : मारलेगाव
- स. ०९:३० : धानोरा
- स. १०:०० : स्वराज्य जनसंपर्क कार्यालय, हदगाव येथे नांदेड भागासाठी पत्रकार परिषद

(उर्वरित पान २ वर)

## ह .भ.प.स्वप्नाली आंबटकर यांना आंतरराष्ट्रीय कीर्तन भूषण पुरस्कार जाहीर

**म्हाळूगे पडवळ गावच्या कन्येचा अयोध्यात होणार सन्मान**



**वडवणी ।** प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील पूणे जिल्ह्याच वैभव आंबेगाव तालुक्याचे वैभव ह, भ ,प ,रामायणाचार्य स्वप्नाली ताई आंबटकर यांना आयोध्या येथील आंतरराष्ट्रीय कीर्तन भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

आंबेगाव तालुक्यातील हुतात्मा बाबू गेणू चे गाव महाळुगे पडवळ या गावची कन्या , आतापर्यंत आपल्या वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून एक स्वतःची आगळी ओळख महाराष्ट्र मध्ये निर्माण केली आहे, आपल्या वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून एक सामाजिक संदेश, आतापर्यंत आपल्या वकृताच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यक्रम सुद्धा पुणे जिल्ह्यामध्ये घेतले आहेत, सातत्याने त्या सामाजिक कार्य मध्ये सुद्धा सहभाग घेतात, महिलांचे प्रश्न महिलावर होणाऱ्या अन्याय अत्याचार संदर्भात त्यांचा पाठपुरावा नेहमी असतो, त्यांच्या या (उर्वरित पान २ वर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

CMYK